# थेट मुलाखत दिनांक- 23/04/2021 रोजी सकाळी 10.00 वाजता

**भरण्यात येणारी पदे- फिजिशिअन/ वैदयकिय अधिकारी, एमबीबीएस/ आयुष वै. अधिकारी व स्टाफ नर्स**

राष्ट्रीय आरोग्य अभियान, सिंधुदुर्ग अधिनिस्त खालील नमुद करणेत आलेली मनुष्यबळ भरती कोवीड - 19 उपचारासाठी जिल्हयात कोरोनाचा कोवीड - 19 वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन उद्रेक सदृष्य परिस्थिती हाताळण्यासाठी अधिकची आरोग्य सेवा देण्याकरिता DCH, DCHC, CCC येथे कोवीड - 19 साथीचा संसर्गजन्य आजार नियंत्रणात येईपर्यंत खालील प्रस्तावित पदांना तीन महिने या कालावधीसाठी नेमणूक देणेकरिता खालीलप्रमाणे थेट मुलाखतीचे आयोजन करणेत येत आहे.

1) जे उमेद्वार डिसीएच/ डिसीएचसीचे (जिल्हा रुग्णालय, सिंधुदुर्ग व उपजिल्हा रुग्णालये) ठिकाणी काम करु इच्छित आहेत त्यांनी दिनांक 23/04/2021 रोजी सकाळी 10.00 वाजता जुने जिल्हा नियोजन समिती सभागृह, सिंधुदुर्गनगरी, तालुका कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग येथे शैक्षणिक मुळ प्रमाणपत्रांसहीत थेट मुलाखतीसाठी उपस्थित राहाणेचे आहे.

2) जे उमेद्वार सीसीसी ( कोवीड केअर सेंटर) या ठिकाणी काम करु इच्छित आहेत त्यांनी दिनांक 23/04/2021 रोजी सकाळी 10.00 वाजता सिंधुदुर्ग जिल्हयातील संबंधित सर्व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयांचे ठिकाणी शैक्षणिक मुळ प्रमाणपत्रांसहीत थेट मुलाखतीसाठी उपस्थित राहाणेचे आहे.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार पुढील तीन महिने करिता मुदतवाढ देणेत येईल. आवश्यकतेनुसार कंत्राटी पद्धतीने मानधन तत्त्वावर भरणेसाठी प्रतिक्षा यादी करणेकरिता अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | मुळ संवर्ग | शैक्षणिक अर्हता | मासिक मानधन | पदे कार्यरत करावयाची ठिकाणे |
|---|---|---|---|---|
| 1 | फिजिशिअन | MD MEDICINE | रु.75000/- | DCH |
| 2 | वैदयकिय अधिकारी | MBBS | रु.60,000/- | DCH/ DCHC |
| 3 | आयुष वैदयकिय अधिकारी | BAMS/BUMS/BDS (Medical Council Registration) | रु. 30,000/- | CCC |
| 4 | स्टाफ नर्स | GNM/ BSC Nursing (Maharashtra Nursing Council Registration) | रु. 20,000/- | DCH/ DCHC/ CCC |
| 5 | बायोमेडिकल इंजिनिअर | B.E. in Biomedical Engineer | रु. 25000/- | District Hospital |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे-**

१) मा. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे नियमितपणे प्राप्त होणा-या भरतीबाबतचे मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करणेत येईल याची पात्र उमेद्वारांनी नोंद घ्यावी.

२) सदर सेवा निव्वळ कोवीड - 19 उपचारासाठी तसेच जिल्हयातील उद्रेक सदृष्य परिस्थिती हाताळण्यासाठी अधिकचे आरोग्य सेवा देणा-या अधिकारी व कर्मचारी यांची आवश्यकता लक्षात घेऊन ठराविक कालावधीसाठी आहेत. भरावयाची पदे राज्य शासनाची नियमित पदे नाहीत. शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनाकडे सेवा संरक्षणासाठी दावा करणेचे कोणतेही अधिकार नियुक्त उमेद्वारास राहणार नाहीत. तसेच कोणतीही पूर्वसुचना न देता सेवा समाप्त करण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांना राहील.

३) सार्वजनिक आरोग्य विभागातुन सेवानिवृत्त कर्मचारी विहित वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हतेचा निकष पुर्ण करीत असतील तर अर्ज करु शकतील. तसेच आशा स्वयंसेविका यांचेमधून जीएनएम अगर एएनएम झालेले उमेद्वार असतील तर त्यांना प्राधान्य देणेत येईल. ज्या एएनएम उमेद्वारांनी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत शैक्षणिक कर्ज घेतलेले आहे त्या उमेद्वारांना प्राधान्य देणेत येईल.

४) जीएमएम/ बीएससी (नर्सिंग) उमेद्वार आवश्यकतेप्रमाणे उपलब्ध झाले नाहीत तरच ANM (आरोग्य सेविका) उमेद्वारांचा विचार करणेत येईल. याची एएनएम उमेद्वारांनी नोंद घेणेची आहे. (आरोग्य सेविकांसाठी एएनएम शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण व एमएनसी कौन्सिलची मान्यता आवश्यक राहील. या पदासाठी मानधन रु. 18000/- (अक्षरी रु. अठरा हजार मात्र) राहिल.

५) फिजिशिअन, वैदयकिय अधिकारी-एमबीबीएस, आयुष वैदयकिय अधिकारी व स्टाफ नर्स या पदासाठी शैक्षणिक अर्हता पुर्ण करणा-या इच्छुक उमेद्वारांनी आपले अर्ज व विहित शैक्षणिक अर्हताधारक प्रमाणपत्रके थेट मुलाखतीवेळी घेऊन येणेची आहेत.

६) निवड झालेल्या उमेद्वारांना राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कर्मचा-यांप्रमाणे राज्य आरोग्य सोसायटीकडून प्राप्त झालेल्या अटी व शर्थी रु. 100/- चे बॉन्डपेपरवर लिहून करारनामा सादर करणे बंधनकारक आहे.

Scanned by CamScanner

७) वयोमर्यादा- वैदयकिय अधिकारी, एमबीबीएस, स्पेशलिस्ट या पदांची भरतीसाठी कमाल वयोमर्यादा 61 वर्षे व सेवा समाप्तीची मर्यादा 70 वर्षे राहिल. स्टाफ नर्स, या पदांची भरतीसाठी कमाल वयोमर्यादा 59 वर्षे व सेवा समाप्तीची मर्यादा 65 वर्षे राहिल. 60 वर्षावरील अर्जादारांकरिता जिल्हा शल्य चिकित्सक प्रमाणित शारिरिक योग्यतेचे प्रमाणपत्रक (मेडिकल फिटनेस सर्टिफिकेट) सादर करणे अनिवार्य राहिल.

८) उमेदवारांना गुणांकन यादी विहित शैक्षणिक अर्हतेच्या अंतिम वर्षाच्या टक्केवारीच्या 70 टक्के या5ठी 70 गुण, उच्च शैक्षणिक अर्हतेसाठी 10 गुण व शासकीय अगर निमशासकीय अनुभवासाठी वर्षाला 4 गूण याप्रमाणे एकूण 20 गुण अशा प्रकारे 100 गुणांचे मुल्यांकन करणेत येईल.

९) कोवीड 19 साठी पदांचे आवश्यकतेनुसार प्रतिक्षा यादीचे क्रमांकानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश देय राहतील.

१०) अर्जदार हा शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

११) शासकीय कर्मचारी यांचेवर पुर्वीच्या शासकीय कर्मचारी कार्यकाळात कुठल्याही प्रकारची प्रशासकीय/ वितिय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद नसावी किंवा झालेली नसावी.

१२) भरती प्रकियेतील सर्व अधिकार मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेजवळ राखुन ठेवणेत आलेले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक<br>राष्ट्रीय आरोग्य अभियान<br>सिंधुदुर्ग | जिल्हा शल्य चिकित्सक<br>जिल्हा रुग्णालय, सिंधुदुर्ग | जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद सिंधुदुर्ग | मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद सिंधुदुर्ग |

Scanned by CamScanner